बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध
**प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर,**

**फोन - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 495**

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्र कडून गृह व चारचाकी वाहनांच्या कर्जाच्या व्याजदरात घट

पुणे दिनांक 12 डिसेंबर 2021 : सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने दिनांक 13 डिसेंबर 2021 पासून सणासुदीच्या हंगामातील धमाका ( रिटेल बोनांझा ) म्हणून गृह कर्ज व चारचाकी वाहनांच्या कर्जाच्या व्याजदरात कपात केली असून पूर्वीच्या अनुक्रमे 6.80 % व 7.05 % वरुन ते 6.40 % व 6.80 % वर आणले आहेत. सदर सणासुदीच्या हंगामातील धमाका ( रिटेल बोनांझा ) व्याजदर हे कर्जदाराच्या पतमापनाशी ( क्रेडिट स्कोअर ) निगडीत आहेत.

सदर सणासुदीच्या हंगामातील धमाका (रिटेल बोनांझा) अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रने सोने, गृह व चारचाकी वाहन कर्जावरील प्रक्रिया शुल्क अगोदरच माफ केले आहे.

“सदर सणासुदीच्या हंगामातील धमाका (रिटेल बोनाञ्झा) देकारामुळे ग्राहकांच्या कर्जावरील खर्चात बचत होऊन त्यांना कर्ज घेण्याचा आनंद लूटता येईल “ असे मत बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी व्यक्त केले.

“गृह व चारचाकी वाहनांसाठीच्या कर्जावरील व्याजदरात सदर सणासुदीच्या हंगामातील धमाका ऑफर ( रिटेल बोनाञ्झा ) देऊ करून आम्ही बँकिंग उद्योगातील रिटेल कर्जावरील सर्वात कमी व्याज दर देऊ केले आहेत. ग्राहकांनी या कमी केलेल्या व्याजदराचा जास्तीतजास्त लाभ घ्यावा “ असे आवाहन बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांनी केले आहे.